


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३२४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.०५ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## वाखरीत अतिक्रमणांवर कारवाई : ५० हून अधिक बांधकामे हटविली

### आषाढीच्या पार्श्वभूमीवर वारकरी सुविधांसाठी २ एकर जागा उपलब्ध



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०४, पंढरपूर :** आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर वाखरी गावातील नियोजनाला वेग आला असून, ग्रामपंचायतीने शुक्रवारी पोलीस बंदोबस्तात मोठी अतिक्रमण हटाव मोहीम राबवली. या कारवाईत ५० हून अधिक अतिक्रमणे हटविण्यात आली. त्यामुळे यात्रा काळात जर्मन हँगर, वारकरी सुविधा केंद्र आणि इतर सोयी उभारण्यासाठी सुमारे दोन एकरांहून अधिक मोकळी जागा उपलब्ध झाली आहे.

विशेष म्हणजे, काही अपवाद वगळता बहुतांश अतिक्रमणधारकांनी ग्राम पंचायत आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने स्वतःहून अतिक्रमणे हटवली. त्यामुळे कारवाई शांततेत पार पडली.

वाखरी हे पालखी मार्गावरील अखेरचे मुक्कामाचे ठिकाण असून येथे संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, संत सोपानकाका यांच्यासह राज्यभरातील विविध संतांच्या पालख्या मुक्कामी असतात. आषाढी नवमीच्या दिवशी गावात सुमारे ६ ते ८ लाख वारकरी मुक्कामी असतात. वाढत्या गर्दीमुळे सार्वजनिक जागा अपुऱ्या पडू लागल्याने प्रशासनाने पालखी तळ परिसरात नवीन भूसंपादन सुरू केले असून, गरजेनुसार खासगी जागांवरही वारकरी सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत दिलेल्या सूचनांनुसार ग्रामपंचायतीने अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावल्या होत्या. त्यानंतरही अतिक्रमणे न हटवल्याने शुक्रवारी कारवाई करण्यात आली.

पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक रेखा घनवट यांनी कारवाईची पाहणी केली. ग्रामपंचायतीच्या विनंतीनुसार चार महिला पोलीस आणि सहा पोलीस कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तीन जेसीबी, दोन ट्रॅक्टर आणि सुमारे दहा कर्मचाऱ्यांच्या मदतीने ग्रामविकास अधिकारी रमेश कोळी यांच्या नेतृत्वाखाली अतिक्रमणे हटविण्यात आली.

कारवाईपूर्वी गुरुवारी ग्रामविकास अधिकारी रमेश कोळी यांनी अतिक्रमणधारकांशी चर्चा करून मोजणीच्या आधारे ग्रामपंचायतीच्या जागेच्या सीमा निश्चित केल्या आणि स्वखुशीने अतिक्रमणे हटविण्याचे आवाहन केले होते. प्रतिसाद न देणाऱ्यांची अतिक्रमणे मात्र जेसीबी आणि ट्रॅक्टरच्या साहाय्याने हटविण्यात आली.

दिवसभर सुरू असलेल्या या कारवाईदरम्यान परिसरात बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. गेल्या सुमारे तीन दशकांपासून असलेली अतिक्रमणे हटवल्यामुळे वाखरी ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असून, पोलीस आणि ग्रामपंचायत प्रशासनाचे अभिनंदन केले आहे.

## सफाई कामगार वारसांचे उपोषण तूर्तास स्थगित

### आ.सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने बैठक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, चंद्रपूर :** लाड-पागे समितीच्या शिफारसी व शासन निर्णयानुसार सफाई कुली/सफाई रेजा (सफाई कामगार) यांच्या वारसांना महानगरपालिका सेवेत सामावून न घेता प्रशासनामार्फत बजावण्यात आलेली नोटीस रद्द करण्यात आल्याने मनपा कामगार वारसांनी उपोषण स्थगित केले आहे. आ. सुधाकर अडबाले, महापौर संगीता खांडेकर यांनी उपोषणकर्त्यांना निंबू पाणी पाजून उपोषण सोडविले.

दि. २२ जून २०२६ पासून मनपा कार्यालयासमोर सुरू असलेल्या बेमुदत आमरण उपोषणाच्या पार्श्वभूमीवर आज आ. सुधाकर अडबाले यांच्या उपस्थितीत मा. महापौर, मा. आयुक्त, उपायुक्त, संबंधित अधिकारी व उपोषणकर्त्यांच्या प्रतिनिधींसमवेत सविस्तर बैठक संपन्न झाली. बैठकीदरम्यान उपोषणकर्त्यांच्या मागण्या, शासन निर्णयातील तरतुदी तसेच संबंधित प्रशासकीय बाबींचा सखोल आढावा घेण्यात आला. यावेळी महानगरपालिका प्रशासनाने बजावलेल्या नोटीस तात्काळ रद्द करण्याचे निर्देश आ. सुधाकर अडबाले यांनी अधिकाऱ्यांना दिले.

तसेच सफाई रेजा/कुली यांच्या नियुक्ती प्रक्रियेमधील अनियमितता व कथित भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्यात यावी, सन १२ ऑगस्ट १९७५ ते २३ फेब्रुवारी २०२३ या कालावधीतील कर्मचाऱ्यांची सेवा-ज्येष्ठता यादी तपासून नियमानुसार नियुक्ती प्रक्रिया राबविण्यात यावी तसेच सफाई कामगारांच्या वारसांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार न्याय्य नियुक्ती देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. चंद्रपूर मनपाने सुजय भारत घडसे यांना नोटीस बजावून वारसा हक्क तत्वावर सेवेत सामावून घेता येणार नसल्याचे कळवले होते, ज्याविरोधात उपोषणाचे हत्यार उपसण्यात आले. सदर प्रश्न मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात आ. सुधाकर अडबाले यांनी लावून धरला. तसेच उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे व राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्याकडे उपोषणकर्त्यांच्या मागण्या सोडविण्यात याव्या, याबाबत बैठक लावण्याची विनंती देखील केली होती. त्यानंतर आज उपायुक्तांनी दिलेल्या पत्राद्वारे ती जुनी नोटीस पूर्णपणे रद्द करण्यात आली असून सफाई कुली व रेजा यांच्या वारसांना सुधारित तरतुदी लागू करण्याबाबत शासनाकडून तातडीने मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त होताच लाड समितीच्या शिफारसीनुसार पुढील नियुक्तीची कार्यवाही करण्यात येईल, असे लेखी आश्वासन मनपा प्रशासनाने दिले आहे. प्रशासनाने लेखी पत्राद्वारे उपोषण मागे घेण्याची अधिकृत विनंती केल्यामुळे आंदोलकांनी आपले उपोषण तूर्तास मागे घेतले असून यामुळे वारसा हक्काच्या प्रतीक्षेत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## सावधान! मुंबई, ठाणे आणि पालघरला रेड अलर्ट




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, मुंबई :** मुंबईत मुसळधार ते अतिमुसळधार स्वरुपाचा पाऊस पडत आहे. विशेष म्हणजे हवामान विभागाकडून मुंबईसाठी पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: मुंबईकरांना घराबाहेर न पडण्याचं आवाहन केलं आहे. हवामान विभागाकडून शनिवार आणि रविवार या दोन दिवसांसाठी पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी नागरिकांना अनावश्यक प्रवास टाळण्याचं आवाहन केलं आहे. यानंतर आता हवामान विभागाने पुढच्या तीन तासांत मुंबई, ठाणे आणि पालघर या तीन जिल्ह्यांसाठी पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. या काळात मुसळधार ते अतिमुसळधार स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**हवामान विभागाकडून १० जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट**

हवामान विभागाने पुढच्या तीन तासांसाठी वेगवेगळ्या जिल्ह्यांसाठी अलर्ट जारी केला आहे. यामध्ये मुंबई, ठाणे, पालघर या तीन जिल्ह्यांना पावसाचा रेड अलर्ट दिला आहे. यानंतर पुणे, रायगड, नाशिक, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. यासोबतच जळगाव, धुळे, जालना, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यांना देखील पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**'या' जिल्ह्यांना यलो अलर्ट**

हवामान विभागाकडून पुढच्या तीन तासांसाठी नंदुरबार, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, लातूर, हिंगोली या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्ये वातावरण ढगाळ असणार आहे. तसेच काही ठिकाणी ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता आहे.

**५ जुलैला कसा पाऊस पडणार?**

हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने या तीनही जिल्ह्यांसाठी ५ जुलैला पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. तर रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तर कोल्हापूर घाट, नाशिक घाट या ठिकाणी देखील पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर पुणे आणि सातारा घाटात पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. याचबरोबर अमरावती, भंडारा, गोंदिया, नागपूर, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**६ जुलैला काय परिस्थिती राहणार?**

येत्या ६ जुलैसाठी पालघर, रायगड, पुणे घाट परिसर या जिल्ह्यांना पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर मुंबई, ठाणे, रत्नागिरी या जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर १६ जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांचा शिळगाव परिसराचा पाहणी दौरा

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०४, शिळगाव (ठाणे) :** मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या समस्यांची पाहणी करण्यासाठी नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांनी आज शिळगाव परिसराचा पाहणी दौरा केला. यावेळी ठाणे महानगरपालिकेचे अधिकारी त्यांच्यासोबत होते.

**स्मशानभूमीतील पाणी तुंबण्याचा प्रश्न**

स्मशानभूमीमध्ये पावसाचे पाणी तुंबले असल्याची तक्रार नागरिकांनी केली होती. त्याची पाहणी करून नगरसेविका पाटील यांनी ठामपा अधिकाऱ्यांना पाण्याचा निचरा होण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.

स्मशानाच्या बाजूला असलेल्या जमीनधारक रोहिदास फौजदार आणि रत्ना फौजदार कुटुंब यांच्याशी चर्चा करून गटार निर्मितीसाठी त्यांची समजूत काढण्यात आली. जमीनधारकांनी जमीन उपलब्ध करून देण्यास आणि गटार बांधण्यासाठी परवानगी दिली आहे.

**गाळेधारकांना दिल्या सूचना**

पाणी निचऱ्यात अडथळा ठरणाऱ्या गाळेधारकांना गाळा दोन फूट मागे घेण्यासाठी सांगण्यात आले. पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत व्हावा यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन नगरसेविका पाटील यांनी केले.

**मंदिर परिसराचीही पाहणी**

नगरसेविका पाटील यांनी परिसरातील हनुमान मंदिर, महाकालेश्वर मंदिर आणि तुळजाभवानी मंदिर या सर्व ठिकाणी पाहणी दौरा केला. मंदिर परिसरात पाणी साचू नये आणि भाविकांना त्रास होऊ नये यासाठी अधिकाऱ्यांना आवश्यक ती स्वच्छता आणि नालेसफाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित**



या पाहणी दौऱ्यात भारतीय जनता पार्टीचे ठाणे जिल्हा अध्यक्ष प्रक्रोष्ट अभियंता साहिल पाटील, भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ कार्यकर्ते बाळाराम पाटील शिवसेनेचे युवा सेना दिवा शहर उप अध्यक्ष वैभव आलिमकर मनसेचे शिळ विभाग अध्यक्ष शरद पाटील, शाखा अध्यक्ष प्रशांत भोईर तसेच परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिळगावच्या समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी आम्ही पाठपुरावा करत आहोत. आता ठामपाने दिलेल्या सूचनांची तातडीने अंमलबजावणी करावी, असे नगरसेविका वेदिका पाटील यांनी सांगितले. नगरसेविकेच्या या पाहणीनंतर नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. आता प्रशासन किती लवकर काम सुरू करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०४, पंढरपूर :** राज्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.



यावेळी आमदार दिलीप वळसे पाटील, नगराध्यक्षा प्रणिती भालके, मंदिर समितीचे सदस्य शकुंतला नडगिरे, ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, संभाजी शिंदे, जिल्हाधिकारी एस.कार्तीकेयन, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत ढगळे, मुख्याधिकारी महेश रोकडे, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

तत्पूर्वी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन विकास आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी करुन माहिती घेतली. यावेळी मंदिर समितीचे सहा अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी मंदिर जतन व संवर्धन विकास आराखड्या अंतर्गत करण्यात आलेल्या व करण्यात येणाऱ्या कामांची माहिती दिली.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर जतन व संवर्धन विकास आराखड्यांतर्गत जीर्णोद्धार पूर्ण झालेल्या मंदिरांतील मूर्तींची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी होम हवन करण्यात आले होते या होम हवनचे दर्शन उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार पवार यांनी यावेळी घेतले.




## नामस्मरणाचा महिमा !

महाराष्ट्रभूमीला जसा शौर्याचा आणि पराक्रमाचा वारसा लाभला आहे तसा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक ठेवाही लाभला आहे. महाराष्ट्राला साधू संतांची भूमी असे म्हटले जाते. वारकरी संप्रदाय हे महाराष्ट्राचे सर्वात मोठे भूषण आहे आणि आषाढी-कार्तिकी एकादशीनिमित्त केली जाणारी पंढरपूर वारी हा राज्यातील सर्वात मोठा महोत्सव असतो. आषाढीची वारी आज गिनीज बुकात नोंदली गेली आहे. आपली सारी व्यावहारिक कामे बाजूला सारून केवळ भगवंताच्या मुखदर्शनासाठी वारकरी पायपीट करत निघतो. या पायपिटीमध्ये तब्येतीची चिंता, खाण्या पिण्याची व्यवस्था, घरच्या पोराबाळांची काळजी सारे काही त्या पांडुरंगावर सोडून वारकरी भगवी पताका घेऊन पंढरीची वाट धरतो आणि तो भक्ताच्या भक्तीच्या भुकेला आसुसलेला पांडुरंगही आपल्या भक्ताची सर्वार्थाने काळजी वाहतो. पांडुरंगाच्या आणि भक्ताच्या अतूट नात्याच्या मिलानोत्सवाला विज्ञानाचे तराजू तोलू शकेल का ? वारकरी संप्रदायाने या महाराष्ट्राला अनेक संत दिले. विठुरायाच्या भक्तीत लिन होऊन या संतांनी साक्षात विठुरायाला प्रसन्न केले. विशेष म्हणजे जात पात यांच्या पलीकडे भक्ती असते याचा प्रत्यक्ष अनुभव विठुरायाने आपल्या भक्तांना दिला आहे. ज्या काळात स्पृश्य- अस्पृश्यता पाळली जात होती, गरीब श्रीमंती भेदाभेद होता त्याही काळात विविध जातीचे विठुरायाचे भक्त संतपदी विराजमान झाले आहेत. पिढीजात श्रीमंतापासून अत्यंत गरीबही आपल्या भक्तीच्या बळावर विठूमाऊलीला प्रिय ठरला आहे. भगवंताच्या दरबारात जाती पातीला, गरीब श्रीमंती भेदभेदाला कवडीचीही किंमत नाही हेच भगवंताने या उदाहरणांतून दाखवून दिले आहे. विठुरायाच्या भक्तीमध्ये लिन होताना आलेल्या अनुभूती आणि मिळालेले ज्ञान या संत मंडळींनी अभंग, ओवी, गवळण आणि भारूड यांच्या माध्यमातून येणाऱ्या पिढीसाठी साध्या सरळ शब्दांत मांडून ठेवले. या संतांचे साहित्य वाचले कि अध्यात्म किती सोपे आहे याची जाण होते. या समस्त ज्ञानगंगेचे सार म्हणजे भगवंताचे नामस्मरण ! ज्ञानेश्वर माउली म्हणतात 'हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा श्र पुण्याची गणना कोण करी श्रश्र '.तर तुकोबाराय सांगतात 'नामसंकीर्तन साधन पै सोपे श्र जळतील पापे जन्मांतरीची श्रश्र' सर्वच संतांनी नामस्मरणाची महती त्यांच्या त्यांच्या शब्दात वर्णिली आहे. भगवंताच्या प्राप्तीचा सर्वात सुलभ मार्ग म्हणजे नामस्मरण. वारकऱ्यांना वारीमध्ये शेकडो मैलाचे अंतर चालण्याचे बळ देणारे माध्यम सुद्धा श्री विठ्ठलाचे नाम तर आहे. कलियुगातील हीच सर्वोत्तम साधना आहे, त्यामुळे संतांनी नामाचे महत्व जागोजागी अधोरेखित केले आहे. संत सावता माळी यांनी पंढरीला न जाताही नामाच्या बळावर श्री विठ्ठलाला प्रसन्न केले.

नामसाधना अशी साधना आहे जिला वेळेचे, स्थानाचे आणि काळाचे बंधन नाही. 'रामसे बडा रामका नाम' हे प्रत्यक्ष श्रीरामांनीही वानरसेनेच्या माध्यमातून साऱ्या जगाला दाखवून दिले. अर्जुनाचा अंतर्मनात श्रीकृष्णाचा जप अखंड चालू असे त्यामुळे त्याने सोडलेला बाण लक्ष्यभेद घेई. छत्रपती शिवाजी महाराज सदैव 'जगदंब जगदंब' असा जप करत ज्याच्या सामर्थ्यावर त्यांना पातशाह्यांविरुध्द लढण्यासाठी आणि हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्यासाठी अध्यात्मिक बळ मिळाले. नामस्मरणाचा महिमा आता विज्ञानाच्या पातळीवर सिद्ध झाला आहे. आत्मा आणि परमात्मा यांचे मिलन घडवून आणणारा दुवा म्हणजे नाम. चार युगाच्या कालखंडातील सध्या कलियुग सुरु आहे. कलियुगातील सामान्य जनावरील व्याप पाहता भगवंताने साधी सोपी नामसाधना सांगितली आहे. केवळ अखंड नामाने कोणीही भगवंताची प्राप्ती करू शकतो. परंतु कलियुगातील रज तमाचे प्रदूषण पाहता नामजपाची अखंडता साधने तितकेही सोपे नाही. त्यासाठी नामाच्या जोडीला सत्संग, सेवा, त्याग, प्रीती(निरपेक्ष प्रेम) यांचे महत्व भगवंताने सांगितले आहे. यांची जोड दिली तर हळूहळू नामाचा संस्कार अंतर्मनावर होऊ लागतो. नामाची अखंडता साधल्यावर चराचरात भगवंताचा वास असल्याची अनुभूती येते, मग भगवंताला भेटण्यासाठी कुठे अन्यत्र जाण्याची आवश्यकताच भासत नाही. भारताच्या सांस्कृतिक इतिहासात अशी अनेक उदाहरणे आहेत, ज्यामध्ये भगवंत स्वतः भक्ताकडे आला आहे, भगवंताने भक्ताची सेवा केल्याचीही कित्येक उदाहरणे आहेत. दरवर्षी राज्यातील अनेक ठिकाणी मंदिरांतून, मोठमोठ्या मैदानातून विविध महाराज आणि कीर्तनकार यांची कीर्तने, हरिनाम सप्ताह चालतात. या कार्यक्रमांना हजारोंची गर्दी असते. कीर्तन जरी भागवतावर अथवा रामायणावर असले तरी या सर्वाचे सार 'नाम' हेच असते. या किर्तनांत लोक माना डोलावताना, लिन होताना दिसतात मात्र यांपैकी किती जण कीर्तनाचे सार म्हणजेच 'नाम' घेण्याचा प्रत्यक्षात प्रयत्न करतात. अध्यात्म हे कृतीचे शास्त्र आहे. श्रवणभक्तीला अध्यात्मात अल्प महत्व आहे, तर प्रत्यक्ष कृतीला अधिक महत्व आहे. कीर्तनात येऊन 'हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा' म्हणत माना डोलवल्या आणि हरीचे नाम घेण्याचा प्रयत्नच केला नाही, तर देव कसा आपल्याला जवळ करेल ? त्यामुळे कीर्तन प्रवचन हे केवळ ज्ञानार्जनाचे माध्यम नसून कृतिला प्रवृत्त करण्याचे साधन आहे, घरी चित्रपट आणि सासू सूनांचे कार्यक्रम पाहत बसण्यापेक्षा कीर्तन प्रवचनांना जाणे नक्कीच श्रेष्ठ आहे; मात्र अध्यात्मात पुढे जायचे असेल, त्यातील आनंद मिळवायचा असेल, तर नामस्मरणाशिवाय पर्याय नाही. हरिपाठ हजारदा म्हटला आणि माऊलीने सांगितलेले हरी नाम घेतलेच नाही तर माउलींना तरी आवडणार आहे का ? नामस्मरण हा साधनेचा पाया आहे त्यामुळे अध्यात्माची गोडी चाखायची असेल तर नियमितपणे नामस्मरण करण्याला पर्याय नाही.

**- जगन घाणेकर**

# बालभारतीच्या पुस्तकात लोककला हरवली..?



रविवार विशेष.. कव्हर स्टोरी!




शालेय पाठ्यपुस्तके ही केवळ अक्षरांची ओळख करून कादीर,देणारी माध्यमं नसतात, तर ती विद्यार्थ्यांच्या मनात आपल्या संस्कृतीची, इतिहासाची आणि परंपरांची पाळेमुळे रुजवणारी महत्त्वाची साधनं असतात. नुकताच महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या (बालभारती) इयत्ता ६ वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातील एका धड्यावरून मोठा वाद निमर्ण झाला आहे.

लोकनृत्य या शीर्षकाच्या असलेल्या धड्यात महाराष्ट्रातील अत्यंत समृद्ध आणि जगप्रसिद्ध लोकपरंपरांना डावलून इतर राज्यांतील लोकनृत्यांना झुकते माप दिल्याचा आरोप होत आहे. ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील अनेक नामवंत अभ्यासक, साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील जाणकारांनी बालभारतीच्या भूमिकेवर तीव्र आक्षेप नोंदवला असून हा वाद आता चांगलाच पेटला आहे. राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना संस्कृती, परंपरा शिकवण्यासाठी पाठ्यपुस्तकात जो धडा समाविष्ट केला जाईल, तेव्हा त्यात महाराष्ट्राच्या मातीतील कलाप्रकारांना प्राधान्य मिळेल अशी साहजिकच अपेक्षा असते. मात्र, बालभारतीच्या पुस्तकात अगदी या विपरीत घडले आहे.

लोकनृत्य शीर्षकाच्या या धड्यात एकूण ५ लोकनृत्यांचा उल्लेख करण्यात आला आहे. ज्यामध्ये महाराष्ट्रातील केवळ वारकरी दिंडी हे एकमेव लोकनृत्य घेण्यात आले आहे. तर उर्वरित ४ लोकनृत्ये ही भारताच्या इतर वेगवेगळ्या राज्यांतील आहेत. यामध्ये पंजाबचा भांगडा, गुजरातचा गरबा, बिहारमधील आदिवासी नृत्य आणि छत्तीसगडच्या बस्तर भागातील लोकनृत्याचा समावेश करण्यात आला आहे. खरे तर या धड्यातून महाराष्ट्रातील मराठी मनाला आणि संस्कृतीला साद घालणारी लावणी, लेझीम, कोळी नृत्य, जागरण-गोंधळ, पोवाडा, धनगर समाजाचे ढोलाच्या तालावरील पारंपरिक नृत्य यांसारख्या कलाप्रकारांची ओळख करून द्यायला हवी होती. परंतु त्याऐवजी परराज्यातील नृत्यांना सहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बालमनावर बिंबवण्याचा प्रयत्न होत आहे. यावर अभ्यासकांनी तीव्र आक्षेप घेतला आहे.

महाराष्ट्र ही संतांची, वीरांची आणि अत्यंत वैभवशाली सांस्कृतिक वारसा लाभलेली भूमी आहे. प्रत्येक मैलानुसार बदलणाऱ्या भौगोलिक स्थानाला स्वतःची अशी एक वेगळी परंपरा आहे. या परंपरेत लोककला आणि लोकनृत्यांना महत्त्वाचे स्थान आहे. असे असूनही या धड्यात महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेला डावलण्यात आले आहे. जर सहावीच्या विद्यार्थ्यांना लोकनृत्यांची ओळख करून द्यायचीच होती, तर आधी आपल्या राज्यातील वैविध्यपूर्ण लोककलांची ओळख सविस्तरपणे करून देणे गरजेचे होते. तसे न करता आपल्या घरची श्रीमंती बाजूला ठेवून शेजाऱ्यांच्या वैभवाचे गुणगान गाण्याचा हा प्रकार आहे. महाराष्ट्रातील मुलांना आधी स्वतःच्या राज्याची संस्कृती, मातीचा गंध आणि या मातीतून जन्माला आलेल्या लोककला समजायला हव्यात.

परराज्यातील संस्कृतीचा आदर नक्कीच असावा, पण तो स्वतःच्या संस्कृतीला डावलून किंवा तिची उपेक्षा करून नसावा. सर्वात खेदाची बाब म्हणजे, या धड्यावरून एवढा मोठा वाद निर्माण झालेला असतानाही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आणि बालभारती यांनी अद्याप यावर कोणताही अधिकृत खुलासा केलेला नाही. या मौनामुळे शिक्षण वर्तुळात संताप आणखी वाढला असून, निर्णय प्रक्रियेतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. बालभारतीचा अभ्यासक्रम तयार करताना देशातील विविधतेची ओळख करून देणे आणि राष्ट्रीय एकात्मता जोपासणे हा हेतू असू शकतो. पंजाब, गुजरात, बिहार आणि छत्तीसगडच्या लोकनृत्यांचा समावेश करण्यामागे भारतीय संस्कृतीची बहुविधता विद्यार्थ्यांना कळावी हा यामागे विचार चार असू शकतो. परंतु, राष्ट्रीय एकात्मतेचा पाठ देताना प्रादेशिक अस्मिता आणि स्थानिक वारसा दुय्यम ठरवला जाऊ शकत नाही. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या टप्प्यावर मुलांना आधी स्वतःच्या परिघातील संस्कृतीशी जोडणे हे मानसशास्त्रीयदृष्ट्या अधिक योग्य असते. महाराष्ट्रात राहणाऱ्या विद्यार्थ्याला लेझीम, पोवाडे किंवा गोंधळ यामागचा इतिहास, या लोककलांच्या सादरीकरणाची पद्धत माहीत नसताना, त्याने थेट छत्तीसगडच्या बस्तर नृत्याचा अभ्यास करावा, हा अभ्यासक्रम तयार करणाऱ्या तज्ज्ञांचा वैचारिक गोंधळ नाही तर दुसरे काय? हा वाद आता केवळ साहित्यिक वर्तुळापुरता मर्यादित राहिलेला नसून, सामाजिक माध्यमे आणि राजकीय स्तरावरही या धड्यावर चर्चा सुरू झाली आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक धोरणावर आणि शिक्षण पद्धतीवर नेहमीच जागरूक असणाऱ्या या राज्यात, थेट बालभारतीच्या पुस्तकावर आक्षेप घेतल्याने शासनाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

बालभारतीची पुस्तके अत्यंत जबाबदारीने आणि तज्ज्ञांच्या समितीकडून तयार केली जातात. अशा वेळी महाराष्ट्रातील एवढ्या मोठ्या लोकपरंपरेची उपेक्षा होणे ही नक्कीच या तज्ज्ञांना विचार करायला लावणारी गोष्ट आहे. विविधतेत एकता साजरी करताना आपल्या स्वतःच्या समृद्ध मुळांना विसरून चालणार नाही. या वादाच्या निमित्ताने पाठ्यपुस्तक निर्मिती प्रक्रियेतील त्रुटींवर पुन्हा एकदा प्रकाश पडला आहे. आता शासन यावर काय पाऊल उचलते आणि बालभारती आपली चूक सुधारून महाराष्ट्राच्या लावणी, लेझीम, पोवाड्याला पुस्तकात त्यांचे हक्काचे मानाचे स्थान परत देते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. आधीच इंग्रजी माध्यमात शिकणारी पिढी प्रचंड सांस्कृतिक, भाषिक घुसळणीतून जात आहे. अशा स्थितीत महाराष्ट्रातील शालेय विद्यार्थ्यांना इथल्या मातीतल्या लोककला, परंपरांचे धडे कसे काय मिळतील याला प्राधान्य देणे खूपच गरजेचे आहे. त्यासाठी आधी बालभारतीच्या तज्ज्ञांनी स्वतःच्या मनातला सांस्कृतिक गोंधळ दूर करायला हवा.

# पाहुण्यांवर राजकारण करणारे बुटके विचार...!

काही माणसे स्वतःच्या कर्तृत्वावर समाजात स्थान निर्माण करू शकत नाहीत. त्यामुळे दुसऱ्याला कमी लेखण्यात, त्याचे मानसिक खच्चीकरण करण्यात आणि त्याच्या नातेसंबंधांचा वापर करून स्वतःचा खोटा मोठेपणा सिद्ध करण्यातच त्यांना समाधान मिळते. हीच मानसिकता आज गावोगावी वाढताना दिसत आहे.एखाद्या व्यक्तीशी मतभेद असले की, त्याच्या पाहुण्यांना, नातेवाईकांना किंवा मित्रांना मुद्दाम आपल्या कार्यक्रमात बोलवायचे असा संदेश देण्यासाठी की तुमचे पाहुणे देखील तुमचे नाहीत तर ते आमचे आहेत.ही संस्कृती नव्हे; हा अहंकाराचा उन्माद आहे.दुसऱ्याच्या पाहुण्यांवर राजकारण करून स्वतःला विजेता समजणारे प्रत्यक्षात स्वतःच्या विचारांचे दिवाळे काढत असतात. कारण माणसे ही कोणाची मालमत्ता नसतात. प्रत्येकाला कोणाकडे जायचे, कोणाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहायचे याचे स्वातंत्र्य आहे. त्या स्वातंत्र्याचा वापर करून दुसऱ्याला डिवचण्याचा प्रयत्न करणारे स्वतःच आपल्या संकुचित मानसिकतेचे प्रदर्शन करत असतात.

आज समाजात कामापेक्षा दिखाऊपणा, विचारांपेक्षा प्रसिद्धी आणि माणुसकीपेक्षा अहंकार मोठा होत चालला आहे. पण अशा क्षुद्र डावपेचांनी कुणाची प्रतिष्ठा कमी होत नाही. उलट अशा वर्तनामुळे लोक संबंधित व्यक्तीची मानसिकता ओळखू लागतात.

खरे मोठेपण विरोधकाच्या पाहुण्यांना बोलावण्यात नसते; तर विरोधकाचा सन्मान राखण्यात असते. खरा प्रभाव सोशल मीडियावरील छायाचित्रांत नसतो; तो लोकांच्या मनात असतो. ज्याने माणसे जिंकली तोच खरा विजेता; ज्याने केवळ फोटो जिंकले, तो इतिहासात कधीच मोठा ठरत नाही.समाजाने अशा अपप्रवृत्तीला वेळेत ओळखले पाहिजे. कारण आज पाहुण्यांवर राजकारण करणारे उद्या समाजातील प्रत्येक नात्यावर राजकारण करतील. मतभेद असावेत, पण ते विचारांचे असावेत;नातेसंबंधांचा वापर करून सूड उगवण्याचे साधन बनू नयेत.

सभ्य समाजात विजय हा चारित्र्याचा असतो, कारस्थानांचा नाही. त्यामुळे दुसऱ्याला कमी दाखवण्यापेक्षा स्वतः मोठे होण्याचा प्रयत्न करा. कारण उंची खुर्चीने वाढत नाही, ती विचारांनी वाढते.

**- रघुनाथ थोरात**
**उंब्रज, सातारा**

## व्युत्पत्ति

हव्यास करी किती
समाधान हवे चित्ती
प्रयासपहावा करुन
सहज अंगी सद्वृत्ती

सर्वोच्च पदा असता
घे योग्यवेळी निवृत्ती
आपल्याहूनसर्वोत्तम
यावी नव्यानेआवृत्ती

उगा चिकटूनि राहणे
चुकीचीघातकप्रवृत्ती
प्रवाह वाहताअसावा
सहज येईलं व्युत्पत्ति

वाव द्यावा मागच्यांस
जागृत होई चिद्वृत्ति
सुरूवात करे आपण
बाकी करतीअनुवृत्ति

उघडू पहावा खजिना
अगाधअमोल संपत्ती
आपल्याहून योग्यतम
असे कार्यकर्ते उत्पत्ती

कोळशाच्या काळोखे
झाकोळून टाके मोती
रोपटेकातळा फोडती
समृध्द उपजावू माती

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज अचूक वृत्त, अचूक बातमी

# तपस्या : ध्येय, श्रद्धा आणि समर्पणाचा सर्वोच्च आदर्श

मनुष्याच्या आयुष्यात प्रत्येक जण काही ना काही मिळवण्यासाठी धडपडत असतो. कुणाला यश हवे असते, कुणाला ज्ञान, कुणाला प्रेम, तर कुणाला आत्मिक समाधान. परंतु प्रत्येक ध्येय सहज प्राप्त होत नाही. त्यासाठी लागते दृढ इच्छाशक्ती, अखंड परिश्रम, संयम आणि अढळ श्रद्धा. या चारही गुणांचा संगम ज्या मार्गावर होतो, त्यालाच तपस्या म्हणतात.

तपस्या म्हणजे केवळ उपवास करणे, अन्न-पाण्याचा त्याग करणे किंवा जंगलात जाऊन ध्यानधारणा करणे नव्हे. एखाद्या पवित्र ध्येयासाठी मन, बुद्धी आणि आत्मा पूर्णपणे समर्पित करून केलेला सातत्यपूर्ण प्रयत्न म्हणजे खरी तपस्या.

भारतीय संस्कृतीत तपस्येची अनेक उदाहरणे आहेत; परंतु माता पार्वतींची तपश्चर्या सर्वश्रेष्ठ मानली जाते. हिमालयराज आणि माता मैना यांची लाडकी कन्या असलेली पार्वती राजवाड्यात वाढली होती. सुख, वैभव आणि ऐश्वर्य तिच्या पायाशी होते. तरीही तिच्या मनात एकच ध्यास होताभगवान शिवांना पती म्हणून प्राप्त करण्याचा.

ही इच्छा केवळ सांसारिक नव्हती. शिव आणि शक्ती हे एकमेकांशिवाय अपूर्ण आहेत, या विश्वनियमानुसार आपल्या अर्धांगाशी पुन्हा एकरूप होण्याची ती ओढ होती.

माता-पित्यांना आपल्या लाडक्या मुलीची चिंता वाटत होती. राजवाड्यात वाढलेली कन्या जंगलातील कठोर जीवन कसे सहन करेल? उपवास, ध्यान, थंडी, ऊन, पाऊस आणि संकटांचा सामना कसा करेल? पण माता पार्वतींचा निर्धार अचल होता.

त्यांनी राजवैभवाचा त्याग केला. वल्कल वस्त्रे धारण केली आणि वनात जाऊन एका पर्वतावर कुटी उभारली. तेथून त्यांच्या कठोर तपश्चर्येची सुरुवात झाली.

सुरुवातीला त्या फळाहारावर राहिल्या. त्यानंतर अनेक वर्षे केवळ पाण्यावर तप केले. पुढे फक्त बेलपत्र ग्रहण करून त्यांनी शिवध्यान सुरू ठेवले. उरलेल्या वेळेत त्या लावलेल्या वृक्षांची सेवा करत आणि पुन्हा ध्यानात तल्लीन होत. अखेरीस त्यांनी बेलपत्राचाही त्याग करून केवळ प्राणवायूवर तपश्चर्या केली.

त्यांच्या तपशक्तीने संपूर्ण सृष्टी थरारून गेली. देवतांनाही त्यांच्या तपाचे सामर्थ्य जाणवू लागले. अखेर सर्व देव भगवान शिवांकडे गेले आणि माता पार्वतींच्या तपस्येची माहिती दिली. भगवान शिवांनी त्यांच्या प्रेमाची आणि निष्ठेची परीक्षा घेण्याचे ठरवले. ते एका वृद्ध ब्राह्मणाचा वेष धारण करून माता पार्वतींसमोर आले.

राजकन्या असून इतका कठोर तप का करता? असा त्यांनी प्रश्न केला.

दासीने उत्तर दिले, माता भगवान शिवांना पती म्हणून प्राप्त करण्यासाठी तप करत आहेत.

हे ऐकून ब्राह्मणरूपी शिव म्हणाले, या सृष्टीत अनेक राजकुमार आणि देव आहेत. त्या विरक्त, स्मशानवासी योगीशी विवाह करण्यासाठी एवढी तपस्या कशाला?

महादेवांविषयी असे शब्द ऐकताच माता पार्वतींच्या डोळ्यांत तेज दाटले. त्यांनी अत्यंत ठामपणे उत्तर दिले

महादेवांना ओळखण्यासाठी बाह्य रूप पाहून चालत नाही. त्यांच्या प्रत्येक अलंकारामागे, प्रत्येक कृतीमागे आणि प्रत्येक रूपामागे विश्वकल्याणाचे गूढ दडलेले आहे. त्यांना जाणण्यासाठी शुद्ध दृष्टी आणि निर्मळ भक्ती लागते.

इतकेच नव्हे, तर त्यांनी स्पष्ट सांगितले, माझ्या महादेवांविषयी एकही अपशब्द मी सहन करणार नाही.

हे निस्सीम प्रेम, अढळ श्रद्धा आणि अखंड समर्पण पाहून भगवान शिव प्रसन्न झाले. त्यांनी आपले दिव्य स्वरूप प्रकट केले. महादेवांचे दर्शन होताच माता पार्वतींचे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले. नम्रतेने त्यांनी एकच इच्छा व्यक्त केलीमला तुमची अर्धांगिनी व्हायचे आहे.

भगवान शिव स्मितहास्य करत म्हणाले, तथास्तु! तुझी तपस्या पूर्ण झाली.

अशा प्रकारे शिव आणि शक्तीचे दिव्य मिलन झाले. त्या मिलनातून संपूर्ण सृष्टीला प्रेम, श्रद्धा, संयम आणि समर्पणाचा अमूल्य संदेश मिळाला.

आजच्या काळातही माता पार्वतींची तपस्या आपल्याला प्रेरणा देते. प्रत्येक ध्येयासाठी संघर्ष करावा लागतो. संकटे येतात, अडथळे येतात, लोक हसतात, नाउमेद करतात; पण ज्याची श्रद्धा अढळ असते, ज्याचे प्रयत्न सातत्यपूर्ण असतात आणि ज्याचे मन ध्येयाशी एकरूप झालेले असते, त्याला यश नक्कीच मिळते.

तपस्या ही केवळ देवप्राप्तीचा मार्ग नाही; ती स्वतःला घडवण्याची प्रक्रिया आहे.

ज्याने स्वतःच्या मनावर विजय मिळवला, त्याच्यासाठी या जगात अशक्य असे काहीच राहत नाही.

।। हर हर महादेव ।।

**: लेखिका :**
**कल्याणी पवार मो.९७५५९२६२४५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# कोरीव सिंहासनावर विराजमान होणार श्री काळभैरवनाथ

## पुणेवाडीत श्री काळभैरवनाथांच्या वज्रलेप पुनः प्रतिष्ठापनेचा ऐतिहासिक सोहळा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील पुणेवाडी येथील श्री काळभैरवनाथांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत, ऐतिहासिक आणि धार्मिक सोहळा संपन्न होणार आहे. गुरुवार, दि.०९ जुलै रोजी श्री काळभैरवनाथांच्या पुरातन मूर्तीचा वज्रलेप पुनः प्रतिष्ठापना सोहळा भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात येणार आहे. या सोहळ्यासाठी परमपूज्य बालयोगी सदानंद महाराज (तुंगारेश्वर पर्वत निवासी) आणि डॉ.नारायण महाराज जाधव (देवाची आळंदी) यांचे विशेष मार्गदर्शन व उपस्थिती लाभणार असून, त्यांच्याहस्ते मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाईल. प्रमुख उपस्थितीमध्ये रामाणाचार्य विश्वनाथ महाराज वारिंगे, भागवताचार्य डॉ. विकासानंद मिसाळ महाराज, सचिन महाराज शेटे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सोहळ्याची सुरुवात सकाळी १० वाजता पुणेवाडी फाटा येथून भव्य मिरवणुकीने होईल. यामध्ये तरुणांची बाईक रॅली आणि पारंपरिक वाद्यांच्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमून जाणार आहे.

मिरवणूक मार्गावर ग्रामस्थांनी रांगोळ्या, फुलांची सजावट आणि फटाक्यांच्या आतषबाजीने बाबांच्या स्वागताची जय्यत तयारी केली आहे. सकाळी ११ वाजता विधीवत होम-हवन आणि धार्मिक विधींनंतर मूतची प्राणप्रतिष्ठापना केली जाईल. त्यानंतर महाआरती आणि दर्शनासाठी भाविकांना प्रवेश दिला जाणार असून, शेवटी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे, काळभैरवनाथांच्या मूर्तीसाठी कोरीव दगडांतून एक अत्यंत आकर्षक सिंहासन तयार करण्यात येत आहे. याशिवाय, प्राणप्रतिष्ठापनेनंतर या सिंहासनावर सुमारे ४० किलो वजनाचे चांदीचे कोरीव काम असलेले मंदिर उभारण्याचा मानस ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. पुणेवाडी ग्रामस्थांनी या अध्यात्मिक सोहळ्याची सर्व तयारी पूर्ण केली असून, परिसरातील सर्व भाविक भक्तांनी या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सलगर येथे कारहुणवी सण उत्साहात; बैलांच्या कारुणी गाड्यांनी वेधले लक्ष



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.०३, सलगर (सोलापूर) :** आषाढ महिन्यात पारंपरिक श्रद्धा, संस्कृती आणि ग्रामएकतेचे प्रतीक मानला जाणारा कारहुणवी (कारुणी) सण अक्कलकोट तालुक्यातील मौजे सलगर येथे मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या पारंपरिक उत्सवाला पंचक्रोशीतील नागरिकांसह पुणे, मुंबई आणि इतर शहरांतून आलेल्या भाविक व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यात्रेचे प्रमुख आकर्षण ठरले ते मारुती मंदिराभोवती पारंपरिक पद्धतीने पळविण्यात आलेल्या कारुणी बैलगाड्या. सलगरसह भीमपूर, चिक्केहळळी, निंगदळी आदी गावांतील सजविलेल्या बैलांनी आणि त्यांच्या वेगवान धावांनी उपस्थितांची मने जिंकली. बैलगाड्यांच्या चित्तथरारक फेऱ्या पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय व उत्सवी वातावरणाने भारावून गेला होता.

या उत्सवाला आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, सोलापूरचे नगरसेवक तथा शिवसेना जिल्हाध्यक्ष अमोल (बापू) शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून सणाचा आनंद घेतला. उपस्थित मान्यवरांनी या परंपरेचे जतन करणाऱ्या ग्रामस्थांचे कौतुक केले. यावेळी मारुती देवस्थानच्या वतीने भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. रात्रीच्या सत्रात कन्नड नाटकाचा रंगतदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमालाही ग्रामस्थ व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उत्सव यशस्वी करण्यासाठी मारुती देवस्थानचे ट्रस्टी सातलिंग गुंडरगी, माजी सरपंच प्रवीण शटगार, माजी जिल्हा परिषद सदस्य अशोक पाटील, रेवणप्पा बोरगाव, सरपंच काशिनाथ कुंभार, उपसरपंच मिलिंद तात्यासाहेब देशमुख, नागनाथ तात्यासाहेब देशमुख, भीमशा समाणे, मल्लिनाथ भासगी, डॉ.घोडके, धसाडे, तोटप्पा बिराजदार तसेच ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

# नगराध्यक्षा कोटलावार यांच्या पुढाकारातून पहिल्या टप्प्यात १३ मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वी



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०४, कुंडलवाडी (नांदेड) :** एल.व्ही. प्रसाद आय इन्स्टिट्यूट, हैदराबाद (भोसले गोपाळराव पाटील आय सेंटर, मुधोळ), मुक्कांगण सेवाभावी संस्था, धर्माबाद आणि कै. के.रामलू साहेब प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत नेत्र तपासणी शिबिराच्या पहिल्या टप्प्यात १३ रुग्णांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या. नुकतेच या शिबिरात एकूण २६२ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यामध्ये ८२ रुग्णांमध्ये मोतीबिंदू, तर ४४ रुग्णांमध्ये नेत्र मांसवृद्धी असल्याचे निदान झाले. शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरलेल्या सर्व रुग्णांवर मुधोळ येथील भोसले गोपाळराव पाटील आय सेंटरमध्ये टप्प्याटप्प्याने मोफत शस्त्रक्रिया करून लेन्स बसविण्यात येत आहेत. डॉ.सना व डॉ.भाविका नेत्ररोग तज्ञ यांनी शस्त्रक्रिया केली. पहिल्या टप्प्यात १५ रुग्णांना मुधोळ येथे नेण्यात आले. त्यापैकी १३ रुग्णांच्या मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉक्टरांनी यशस्वीरीत्या केल्या. उर्वरित पात्र रुग्णांवर ही लवकरच मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती कै.के.रामलू साहेब प्रतिष्ठानचे अध्यक्ष गजानन कोटलावार यांनी दिली. या सामाजिक उपक्रमासाठी नगराध्यक्षाप्रेरणाताई गजानन कोटलावार, उपनगराध्यक्षा नेहाताई शैलेश ऱ्याकावार, नगराध्यक्ष प्रतिनिधी गजानन कोटलावार, शैलेश ऱ्याकावार, भाजपा मंडळ अध्यक्ष बंटी ठक्करवार, भाजपा पदाधिकारी तसेच सर्व नगरसेवक - नगरसेविकांचे विशेष सहकार्य लाभले. शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांनी एल.व्ही.प्रसाद आय इन्स्टिट्यूटच्या तज्ज्ञ डॉक्टरांचे, आरोग्य कर्मचाऱ्यांचे व सर्व आयोजकांचे मनःपूर्वक आभार मानले.

# पेण तालुक्यात बालगंगानदीने धोक्याची पातळी ओलांडली; पुरामुळेगावाचा संपर्क तुटला



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०४, पेण (रायगड) :** पेण तालुक्यात गेल्या तीन दिवसा पासून पडत असलेल्या मुसळधार पावसाने जोरदार बॅटींग सुरू होती. मात्र शनिवार, दिनांक ०४ जुलै २०२६ रोजी सकाळ पासून मुसळधार पावसाने सुरुवात केल्याने बालगंगा नदीला पूर आला होता. त्यामुळे पेण तालुक्याशी जावळी, निफाड, करोटी, निधवली, पाडले, आदिवासी वाड्याचा व गावचा तालुक्याशी संपर्क तुटला होता.

बालगंगा नदीचा पाणी रस्त्यावर आल्याने जाण्या येण्यास मार्ग बंद झाला होता. मुसळधार पाऊस असल्याने नोकरदारांना घरीच राहावे लागले. गेल्या ३ दिवसापासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. मुसळधार पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून बालगंगा नदी दुधडी भरून वाहून अनेकांच्या शेतांत नदीचे पाणी शिरले होते.

दिनांक ०४ जुलैदुपार पासून पाण्याचा जोर कमी झाल्याने दुपार नंतर रस्त्यावर वाहतूक सुरळीत झाली. पावसाची दमदार हजेरी लावल्याने बालगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडली होती त्यामुळे ग्रामीण भागातील रस्ते पाण्या खाली गेले होते. गेल्या दोन दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे पेण तालुक्यातसह ग्रामीण भागाला पावसाने झोडपले आहे. मुसळधार पाऊस पडत असल्याने याचा फटका शेतीला बसण्याची शक्यता ना करता येत नाही.

# कीटकजन्य व जलजन्य आजारांवर प्रतिबंधासाठी जनजागृती



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०४, नागपूर :** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डेंग्यू, हिवताप, चिकनगुनिया तसेच जलजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र चिचोलीच्या वतीने दिनांक ०३ जुलै २०२६ रोजी उपकेंद्र खापरखेडा येथे व्यापक जनजागृती व प्रतिबंधात्मक मोहीम राबविण्यात आली. प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ.जयश्री पेटकर, डॉ.दीपक तरार व डॉ.अश्विनी शिरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम पार पडली. या मोहिमेत गावातील घराघरांत कंटेनर सर्वे करून डासांच्या अळ्यांची तपासणी करण्यात आली. ज्या ठिकाणी अळ्या आढळण्याची शक्यता होती, तेथे टेमीफॉसचा वापर करून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या. तसेच नागरिकांना घर व परिसर स्वच्छ ठेवणे, पाणी साचू न देणे, पाण्याची भांडी झाकून ठेवणे, आठवड्यातून एक दिवस 'ड्राय डे' पाळणे आणि ताप, अंगदुखी किंवा इतर लक्षणे आढळल्यास तातडीने शासकीय आरोग्य केंद्रात उपचार घेण्याचे आवाहन करण्यात आले. सर्वे दरम्यान आयोजित गटसभेत गावातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांच्या उपस्थितीत डेंग्यू, हिवताप, चिकनगुनिया तसेच जलजन्य आजारांची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय आणि वेळेत उपचाराचे महत्त्व याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. नागरिकांनीही मोहिमेला सकारात्मक प्रतिसाद देत आरोग्य विभागाच्या सूचनांचे पालन करण्याची ग्वाही दिली.

या उपक्रमात सामुदायिक आरोग्य अधिकारी माधुरी उके, आरोग्य सहाय्यक धीरज टेकाळे, आरोग्य साहाय्यक धनंजय ढोके व आरोग्य सेवक गौतम खोब्रागडे, आरोग्य सेविका देवकला पानतावणे व वैशाली लोहकरे तसेच सर्व आशा स्वयंसेविकांनी सक्रिय सहभाग नोंदवून मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीत मोलाचे योगदान दिले.

दरम्यान, प्राथमिक आरोग्य केंद्र चिचोली अंतर्गत येणाऱ्या सर्व उपकेंद्रांमध्येही प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार कीटकजन्य व जलजन्य आजारांविरोधातील जनजागृती, कंटेनर सर्वे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांची मोहीम सातत्याने राबविण्यात येत असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली.

पावसाळ्यात संसर्गजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी नागरिकांनी आरोग्य विभागाला सहकार्य करण्याचे आवाहन ही यावेळी करण्यात आले.

# भरकटलेल्या समाजाला संस्कारांच्या वाटेवर आणण्यासाठी चंद्रहास शेजवळ यांच्यासारख्या साहित्यिकांची नितांत गरज




**अक्षरात : रघुनाथ थोरात**

**दि.०४, उंब्रज (सातारा) :** ज्येष्ठ साहित्यिक चंद्रहास शेजवळ यांच्या पालीचा खंडोबा या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा नुकताच पाली तालुका कराड येथे पार पडला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री खंडोबा देवस्थानचे मानकरी देवराज दादा पाटील हे होते. यावेळी ॲड.मोहिते बोलताना म्हणाले की, एक सात्विक, प्रतिभा संपन्न, ध्येयवेडा, परखड साहित्यिक म्हणून चंद्रहास शेजवळ यांचा नावलौकिक सर्वत्र दिसून येतो. अवघ्या वयाच्या १८ व्या वर्षी साहित्य क्षेत्रात शेजवळ सरांचा प्रवेश झाला. बघता बघता वेगवेगळ्या विषयावर २५ पुस्तके प्रकाशित झाली. तरुणाईला व्यसनाधीनता पासून रोखण्यासाठी भरकटलेल्या समाजाला संस्काराच्या रुळावर आणण्यासाठी शेजवळ सरांच्या सारखे अनेक साहित्यिक समाजामध्ये निर्माण होणे ही काळाची गरज आहे.

लोप पावत चाललेली वाचन संस्कृती तरुणांच्या मध्ये अंगी करण्यासाठी दर्जेदार साहित्य निर्माण व्हायला पाहिजेत. त्यासाठी समाजाने सुद्धा साहित्यिकांच्या पाठीशी उभा राहणे तितकेच महत्त्वाचे आहे. यावेळी खंडोबा देवस्थानचे मानकरी देवराज पाटील यांनी पालीचा खंडोबा हे पुस्तक शेजवळ सरांनी प्रकाशित करून पालीच्या गौरवामध्ये भर टाकण्याचे मोठे काम केले आहे.

पालीच्या खंडोबाचा इतिहास पुस्तकाच्या माध्यमातून सर्व दूर पोहोचवण्याचे अतिशय चांगले काम शेजवळ यांनी केल्याबद्दल त्यांचे देवराज पाटील यांनी खास करून कौतुक केले. यावेळी माजी प्राचार्य राजेंद्र शेजवळ, सातारा जि.प.सदस्य मदनराव काळभोर, सातारा जिल्हा भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष सुरेश पाटील, संकपाळ सर उंब्रज, डॉ.अभय जाधव बालरोग तज्ञ उंब्रज, डॉ.रूपाली बेंद्रे, नागठाणे या सर्वांनी आपली मनोगते व्यक्त केली. तर कार्यक्रमांस पाली गावाच्या सरपंच सुनीता घाडगे, डॉ.बेंद्रे नागठाणे, कमलाकर शेजवळ इ. होते.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रस्ताविक योगेश्वर सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शंकरराव शेजवळ यांनी केले. सूत्रसंचालन जाधव सर यांनी केले तर शेवटी आभार ॲड.विशाल शेजवळ यांनी मानले. यावेळी उंब्रज पाल आणि परिसरातील शिक्षक वर्ग, ग्रामस्थ भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# विशेष सखोल पुनरिक्षण (S.I.R) गणना फार्म वाटप व जनजागृती



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, पालम (परभणी) :** भारत निवडणुक आयोगाच्या निर्देशानुसार सुरु असलेल्या मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाअंतर्गत पालम तालुक्यात शहरी व ग्रामीण भागातील सर्व मतदान केंद्र / गावात गणना फार्म (Eluminiration Form) वाटप करण्यास दिनांक ३० जून २०२६ पासून सुरु झालेली आहे. त्या अनुषंगाने आज दिनांक ०४ जुलै २०२६ रोजी आजमाबाद येथे जिवराज डापकर उपविभागीय अधिकारी गंगाखेड तथा मतदार नोंदणी अधिकारी यांनी भेट दिली व फार्म वाटप बाबतचा आढावा घेतला व मार्गदर्शन केले. तसेच या कार्यक्रमात नागरिकांनी मतदार यादी अचुक, अदयावत व त्रुटीमुक्त करण्यासाठी सक्रीय सहभाग नोंदवावा असे आवाहन केले.

विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम दरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकारी ( बिएलओ) मतदारांच्या घरी भेट देऊन गणना फार्म चे वितरण करणार आहेत. नागरिकांनी हा फार्म काळजीपूर्वक भरुन त्यातील माहितीची खात्री करावी. आवश्यक असल्यास मागविण्यात आलेली कागदपत्रे वेळेत उपलब्ध करुन देण्यात यावी व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना पूर्ण सहकार्य करावे. मतदार यादीतील प्रत्येक माहिती अचूक राहणे ही अंत्यत महत्वाची बाब असल्याचे स्पष्ट केले. मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, राजकीय पक्षाचे मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बिएलए), पत्रकार, ग्राममहूसल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, पोलीस पाटील, अंगणवाडी ताई तसेच गावपातळीवरील सर्व यंत्रणानी पुढाकार घेऊन जनजागृती व सहकार्य करणे आवश्यक असल्याचे सांगीतले. यावेळी नायब तहसिलदार विनोद पवार, आजमाबाद येथील पर्यवेक्षक, बिएलओ, पोलीस पाटील, अंगणवाडी ताई, ग्रामरोजगार सेवक उपस्थित होते.

# रडीचा डाव नव्हे, लोकशाही मार्गानेच संचालकपदी निवडून आलो - तुषार गोळेगावकर



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, पालम (परभणी) :** परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकचे नवनिर्वाचित संचालक तुषार गोळेगावकर यांनी दि.०३ जुलै २०२६ रोजी पालम येथील हॉटेल मोरया येथे आयोजित पत्रकार परिषदेत विरोधकांनी केलेल्या आरोपांना सडेतोड उत्तर दिले. आम्ही कोणताही रडीचा डाव न खेळता पूर्णपणे लोकशाही आणि कायदेशीर मार्गाने बँकेच्या संचालकपदी निवडून आलो आहोत, असा दावा त्यांनी केला. गोळेगावकर म्हणाले की, आ.डॉ.रत्नाकर गुट्टे यांच्या नेतृत्वाखाली परभणी जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक लढविण्यात आली. या निवडणुकीत ४७ पैकी ४० हून अधिक सोसायट्यांच्या अध्यक्षांचा पाठिंबा असल्यामुळे त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. विरोधकांनी दोन वेगवेगळ्या सोसायट्यांमध्ये सदस्य राहून कर्ज घेतल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर आम्ही कायदेशीर मार्गाने आक्षेप नोंदविला. त्यानंतर विरोधकांनी उच्च न्यायालयात धाव घेतली; मात्र तेथेही त्यांना दिलासा मिळाला नाही. परिणामी संबंधितांचे सोसायटी सदस्यत्व रद्द झाल्याने त्यांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होता आले नाही. त्यामुळे बँकेची निवडणूक बिनविरोध झाली. हा संपूर्ण विजय कायदेशीर प्रक्रियेतून मिळालेला असून त्यामध्ये कोणताही गैरप्रकार किंवा रडीचा डाव नसल्याचे गोळेगावकर यांनी स्पष्ट केले. आजपर्यंत केलेल्या जनसंपर्क आणि लोकांच्या कामामुळेच समाजाचा विश्वास आमच्यावर आहे. त्यामुळेच ही निवडणूक बिनविरोध झाली. राजकारणात कोणाचीही एकाधिकारशाही चालत नाही. सर्वच पदे स्वतःकडे ठेवण्याची विरोधकांची भूमिका योग्य नाही. माझ्यावरील सर्व आरोप बिनबुडाचे असून कोणत्याही वेळी समोरासमोर चर्चा करण्यास मी तयार आहे, असेही त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला नवनिर्वाचित संचालक तुषार भैय्या गोळेगावकर, पालम तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वसंतराव शिरसकर, नगराध्यक्ष प्रतिनिधी जिया खान पठाण, ॲड. संदीप आळणुरे, आ.गुट्टे काका मित्रमंडळाचे पालम प्रभारी माधवराव गायकवाड, नगरसेवक उबेद खान पठाण, पंचायत समितीचे सभापती बाळासाहेब ढोले, उपसभापती बालाजी बर्डे, शेख गौस तसेच विविध सोसायट्यांचे अध्यक्ष उपस्थित होते.

# शासनाच्या योजना प्रत्येक कामगारापर्यंत पोहोचविणार - तेजस्विनी उगले

## देसवडे येथे बांधकाम कामगारांना प्रमाणपत्रांचे वितरण

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** बांधकाम कामगार हा समाजाचा कणा आहे. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ प्रत्येक पात्र कामगारापर्यंत पोहोचविण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. ग्रामीण भागातील एकही कामगार माहितीअभावी वंचित राहू नये, यासाठी जनजागृती, मार्गदर्शन आणि आवश्यक सहकार्य करत राहणार आहोत. कामगारांचे जीवनमान उंचावणे हीच आमची प्राथमिकता आहे. असे मत राष्ट्रवादीच्या टाकळी ढोकेश्वर गटाच्या नेत्या तेजस्विनी उगले यांनी व्यक्त केले.

पारनेर तालुक्यातील देसवडे येथे बुधवार, दि.०१ जुलै रोजी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या तेजस्विनी उगले यांच्या हस्ते बांधकाम कामगारांना बांधकाम कामगार मंडळाच्या विविध योजनांअंतर्गत प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने बांधकाम कामगार व ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमास शिवाजी टेकूडे, धोंडिभाऊ दाते, सचिन भोर, यश दाते, सुयोग दाते, भानुदास तोडकर, सतीश वाडेकर, विठ्ठल फटांगरे, संतोष वाडेकर, उद्योजक सुमित औटी, संतोष टेकूडे, संपत फटांगरे, विद्या फटांगरे, शितल वाडेकर यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमात लाभार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती देऊन कामगारांना आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.



तेजस्विनी ताई उगले यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करून बांधकाम कामगारांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. शासनाच्या कल्याणकारी योजना प्रत्येक सर्वसामान्य बांधकाम कामगारापर्यंत पोहोचाव्यात, त्यांना त्यांचा हक्काचा लाभ मिळावा आणि कोणताही पात्र कामगार वंचित राहू नये, यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत.

**- विद्या फटांगरे (देसवडे)**

# महाबळेश्वर तालुक्यात अतिवृष्टीचा तडाखा; नावली गावातील काही भाग खचला

## प्रशासनाने नागरिकांचे सुरक्षित स्थलांतर केले; गावाला कोणताही धोका नाही – तहसीलदार

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०४, महाबळेश्वर (सातारा) :** सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नावली गावाच्या वरच्या बाजूचा काही भाग शनिवारी सकाळी खचल्याची घटना घडली. झाडांसह मातीचा मोठा भाग रस्त्यावर वाहून आल्याने काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला. प्रशासनाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत मलबा हटविण्याचे काम सुरू केले असून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना हाती घेतल्या आहेत.



घटनास्थळाजवळ गावाची पाण्याची टाकी असल्याने प्रशासनाने विशेष दक्षता घेतली आहे. जिल्हाधिकारी संतोष पाटील यांच्या निर्देशानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) आणि ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे अभियंते पाण्याच्या टाकीची प्रत्यक्ष पाहणी करून सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करत आहेत.

घटनेची माहिती मिळताच प्रांताधिकारी डॉ. योगेश खरमाटे यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली व संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

या ठिकाणाजवळ चार घरे असून त्यापैकी एक घर बंद आहे. उर्वरित तीन घरांतील नागरिकांना समजावून सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्यात आले आहे. प्रशासनाकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात असून सर्व आवश्यक उपाययोजना सुरू आहेत. तहसीलदार सचिन मस्के यांनी सांगितले की, नावली गावाला कोणत्याही प्रकारचा धोका नाही. प्रशासन संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये आणि अफवा पसरवू नयेत. असे आवाहन त्यांनी केले.

# तुकाराम मुंढेंची दूध भेसळीवर मोठी कारवाई

## राज्यभर २५ कठोर नियम लागू, सुट्ट्या दुधाच्या विक्रीसाठीही स्पष्ट अटी

**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.०३, मुंबई :** अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर आय.ए.एस. अधिकारी तुकाराम मुंढे यांनी दूध आणि दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ रोखण्यासाठी आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्यभर दूध पुरवठा साखळी अधिक सुरक्षित आणि पारदर्शक करण्यासाठी पंचवीस मुद्द्यांची सर्वंकष अनुपालन नियमावली लागू करण्यात आली आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधितांवर कठोर कारवाईचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. नवीन आदेशानुसार दूध संकलन, शीतकरण, प्रक्रिया, पॅकेजिंग, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि किरकोळ विक्री अशा प्रत्येक टप्प्यावर अन्न सुरक्षा आणि गुणवत्ता मानकांचे काटेकोर पालन करणे सर्व अन्न व्यवसायचालकांसाठी बंधनकारक राहणार आहे. यामुळे केवळ अंतिम विक्रेत्यालाच नव्हे, तर संपूर्ण पुरवठा साखळीतील जबाबदार घटकांनाही नियमांचे पालन करावे लागणार आहे.



विशेष म्हणजे सुट्ट्या दुधाच्या विक्रीबाबतही स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. सुट्टे दूध विकणाऱ्या विक्रेत्यांनी दुधाचा स्रोत, गुणवत्ता, स्वच्छता आणि अन्न सुरक्षा नियमांचे पालन याची खात्री करणे आवश्यक राहणार आहे. ग्राहकांना सुरक्षित व दर्जेदार दूध उपलब्ध करून देणे ही प्रत्येक संबंधिताची जबाबदारी असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

मुंढे यांनी स्पष्ट केले की, या मोहिमेचा उद्देश केवळ भेसळ रोखणे नाही. सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण, ग्राहकांचा विश्वास वाढवणे, प्रामाणिक दूध व्यवसायांना प्रोत्साहन देणे आणि राज्यात अन्न सुरक्षेची मजबूत संस्कृती निर्माण करणे हे या उपक्रमामागील प्रमुख उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्र हा देशातील प्रमुख दुग्ध उत्पादक राज्यांपैकी एक असून दररोज मोठ्या प्रमाणात दूध संकलन, प्रक्रिया आणि विक्री केली जाते. बालके, गर्भवती महिला, स्तनदा माता, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांसाठी दूध हा दैनंदिन आहारातील महत्त्वाचा घटक असल्याने त्याची सुरक्षितता अत्यंत महत्त्वाची मानली जाते. राज्यभर झालेल्या तपासण्या, नमुना चाचण्या आणि अंमलबजावणी दरम्यान दूध पुरवठा व्यवस्थेतील विविध त्रुटी समोर आल्याने संपूर्ण राज्यासाठी एकसमान आणि कठोर नियमांची गरज असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार ही नवीन नियमावली लागू करण्यात आली असून, पुढील काळात तिची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर प्रशासनाचा भर राहणार आहे. असे वक्तव्य पत्रकार परिषदेत तुकाराम मुंढे यांनी केले.

# पोंभुर्णा तालुक्यात कृषी मोहीम व शेतकरी मार्गदर्शन सभांना वेग

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, नवनवीन शेती पद्धती, बदलत्या हवामानाशी जुळवून घेणारे उपाय आणि शासनाच्या विविध कृषी योजनांची माहिती प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचावी या उद्देशाने पोंभुर्णा तालुक्यात सहाय्यक कृषी अधिकारी गावागावांत कृषी मोहीम व शेतकरी मार्गदर्शन सभांचे आयोजन करीत आहेत.

या मार्गदर्शन सभांमधून शेतकऱ्यांना खरीप हंगामाची तयारी, प्रमुख खरीप पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान, हुमणी किडीचे एकात्मिक व्यवस्थापन, माती परीक्षण व जमीन आरोग्य पत्रिकेचे महत्त्व, महाविस्तार अख ॲपचा वापर, बीबीएफ पद्धतीने पेरणी, टंचाईच्या परिस्थितीत फळबागांचे संरक्षण, बीज प्रक्रिया, बोंडअळीचे एकात्मिक व्यवस्थापन, घरगुती पद्धतीने बियाण्यांची उगवण क्षमता तपासणी आदी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे. याशिवाय हवामानातील बदल व एल निनोच्या संभाव्य परिणामांविषयी जनजागृती करण्यासाठी शिवार फेऱ्यांचे आयोजन, शून्य मशागत पद्धत, भात पिकामध्ये श्री व डीएसआर पद्धतीने लागवड, युरिया ब्रिकेट्सचा वापर, ट्रायकोकार्डचे उत्पादन व उपयोग, पक्षी थांबे, चिकट सापळे आणि मित्र कीटकांचे संवर्धन तसेच अवजार बँकेचा लाभ याबाबतही शेतकऱ्यांना माहिती दिली जात आहे.



आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती गावागावांत...

या मोहिमेद्वारे शेतीतील आव्हानांवर मात करून कमी खर्चात अधिक उत्पादन, नफ्याची शेती आणि अवर्षणाच्या परिस्थितीतही निश्चित उत्पन्न मिळवून देणाऱ्या तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यावर भर देण्यात येत आहे.

तालुक्यातील प्रत्येक शेतकरी आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा स्वीकार करून उत्पादन व उत्पन्नात वाढ करावी, हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. ही कृषी मोहीम व शेतकरी मार्गदर्शन सभा स्वाती ढोबळे (तालुका कृषी अधिकारी, पोंभुर्णा) आणि गणेश गवळी (मंडळ कृषी अधिकारी, पोंभुर्णा) यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील सहाय्यक कृषी अधिकारी प्रभावीपणे राबवत असून, शेतकरी बांधवांकडून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# थोडक्यात बातम्या

## महावितरणच्या गलथान कारभारा विरोधात खा.लंके आक्रमक



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, अहिल्यानगर :** महावितरणच्या कथित निष्काळजी व जनविरोधी कारभारामुळे नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि ग्राहकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांच्या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी येत्या ८ जुलै रोजी अहिल्यानगर येथील महावितरण कार्यालयासमोर तीव्र जनआंदोलन करण्याची घोषणा केली आहे. यासंदर्भात महावितरणचे अधीक्षक अभियंता यांना निवेदन देऊन लंके यांनी आंदोलनापूर्वीच सर्व प्रलंबित प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्याची मागणी केली आहे. अन्यथा उद्भवणाऱ्या परिस्थितीस प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे. मतदारसंघातील अनेक भागात सुरू असलेले अघोषित व अनियमित लोडशेडिंग, जळालेले ट्रान्सफॉर्मर (डीपी) वेळेत न बदलणे, स्मार्ट मीटरमुळे वाढीव व चुकीची वीजबिले, अतिवृष्टी व वादळामुळे नुकसान झालेल्या वीज यंत्रणेची रखडलेली दुरुस्ती, सौरऊर्जा व नेट मीटरिंग प्रकरणांतील विलंब, तक्रार निवारण यंत्रणेचे अपयश, कृषी वीजजोडणीतील विलंब आणि देखभालीच्या अभावामुळे निर्माण होणारे वारंवार तांत्रिक बिघाड या प्रमुख प्रश्नांकडे त्यांनी निवेदनातून लक्ष वेधले आहे.

सौरऊर्जा योजनेसाठी पैसे भरून ही अनेक शेतकऱ्यांना एक ते दोन वर्षे सोलर पॅनेल बसवून मिळत नसल्याचा तसेच काही एजन्सीकडून अतिरिक्त रकमेची मागणी होत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. आंदोलनाद्वारे अघोषित लोडशेडिंग तातडीने बंद करणे, जळालेल्या डीपी कालबद्ध पद्धतीने बदलणे, स्मार्ट मीटर व वाढीव वीजबिलांची उच्चस्तरीय चौकशी करणे, स्मार्ट मीटर सक्तीचे न ठेवणे, अतिवृष्टीग्रस्त वीज पायाभूत सुविधांची त्वरित दुरुस्ती, सोलर व नेट मीटरिंगची प्रकरणे प्राधान्याने निकाली काढणे, तक्रार निवारण यंत्रणा सक्षम करून निष्काळजी अधिकाऱ्यांवर कारवाई करणे आणि कृषी वीज जोडणीची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करणे, या प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत. स्थानिक पातळीवर वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न सुटत नसल्याने जनतेच्या संयमाचा अंत झाला आहे. त्यामुळे शेतकरी, ग्रामस्थ आणि नागरिकांसमवेत ८ जुलै रोजी लोकशाही मार्गाने जन आंदोलन करण्यात येणार आहे, असे खासदार निलेश लंके यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## कान्हुरपठारला सोमवारी भूमिपुत्र शेतकरी संघटनेची बैठक

### बेरोजगार तरुणांसाठी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचा पुढाकार



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर संघटितपणे चर्चा करून भविष्यातील दिशा निश्चित करण्याच्या उद्देशाने भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या वतीने सोमवार, दि.०६ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ही बैठक रेनबो फार्म हाऊस, कान्हूर पठार, ता.पारनेर येथे होणार असल्याची माहिती भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष वाडेकर यांनी दिली. या बैठकीत शेतीसमोरील आव्हाने व पुढील दिशा या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसं सध्याच्या काळात शेतीपुढे उभ्या राहिलेल्या विविध समस्या, उत्पादन खर्चातील वाढ, बाजारपेठेतील चढ-उतार, नैसर्गिक संकटे, शेतमालाला मिळणारा भाव तसेच आधुनिक शेतीच्या संधी आणि शाश्वत शेतीविषयी चर्चा होणार आहे. याशिवाय ग्रामीण भागातील बेरोजगार तरुणांनी कोणते व्यवसाय करावेत, स्वयंरोजगाराच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत आणि शेतीपूरक उद्योगातून आर्थिक प्रगती कशी साधता येईल, याबाबतही विशेष मार्गदर्शन केले जाणार आहे.

या बैठकीस सह्याद्री फार्मर प्रोड्युसर कंपनीचे प्रतिनिधी तात्याराम हिवरे हे मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार असून, ते शेती, कृषी व्यवसाय मूल्यवर्धन, बाजारपेठ, तसेच ग्रामीण उद्योजकतेच्या संधीबाबत सविस्तर माहिती देणार आहेत. भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी तालुक्यातील शेतकरी युवक, कृषी क्षेत्राशी संबंधित नागरिक तसेच स्वयंरोजगाराची इच्छा असलेल्या तरुणांनी या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

## पी.एम.श्री अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश



**अक्षराज :** नितेश पाटील

**दि.०४,** चिमूर : पी.एम.श्री अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा, चिमूर येथील विद्यार्थिनींनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. यंदाच्या शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेतील एकूण ७ पात्र विद्यार्थिनींपैकी ६ विद्यार्थिनी शिष्यवृत्तीस पात्र ठरल्या आहेत.

तसेच तालुक्यातील एकूण १२ पात्र विद्यार्थ्यांपैकी तब्बल ६ विद्यार्थिनी या पी.एम. श्री अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा, चिमूर येथील आहेत ही शाळेसाठी अभिमानाची बाब आहे.

या परीक्षेत कु.बोदीक्षा गायकवाड हिने तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवून विशेष यश संपादन केले आहे.कु. एंजल गेडाम,कु. प्रांजली अवथरे, कु. संचिता शंभरकर, कु. अनुराधा गेडाम,कु. सानिका शेरके या यशस्वी विद्यार्थिनींना शाळेच्या मुख्याध्यापिका सुनिता खोब्रागडे यांचे सक्षम नेतृत्व व मार्गदर्शन लाभले. तसेच दत्तात्रय पुलेनवार, विनय खापर्डे, राजरत्न गजभिये, प्रतिक्षा घ्यार आणि प्रिया बोरकर या शिक्षकांनी विद्यार्थिनींना विशेष शैक्षणिक मार्गदर्शन केले.

शाळेच्या या उल्लेखनीय यशाबद्दल समाजकल्याण विभागाच्या आयुक्त श्रीमती दिपाताई मुधोळ, नागपूर विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसादजी कुलकर्णी, चंद्रपूर जिल्ह्याचे सहायक आयुक्त विनोद मोहतुरे तसेच चिमूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी विशाल बोदाडे यांनी विद्यार्थिनी, शिक्षक व शाळेचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या यशाबद्दल शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी, पालक तसेच विद्यार्थिनींचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, या यशामुळे इतर विद्यार्थिनींनाही प्रेरणा मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.